MHJN030036132018

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०२ | ११ | २०१८ |
| नोंदणी दिनांक | : | ०३ | ११ | २०१८ |
| निकाल दिनांक | : | ०३ | ०६ | २०२६ |
| कालावधी | : | ०७<br>वर्षे | ०७<br>महिने | ०१<br>दिवस |

## मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी– सि. म. पाडोळीकर)

**नियमित फौजदारी खटला क्र.६३६/२०१८** **निशाणी क्र.३८**
(प्रथम खबर अहवाल क्रमांक –४०२/२०१८)
(अपराध कलम — भा.दं.वि चे कलम ३२४, ३२३ व ५०४
सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र,
पोलिस ठाणे – सदर बाजार)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलिस ठाणे अंमलदार,
सदर बाजार, ता. जि. जालना. **.. अभियोगपक्ष**

विरुध्द

१. जिगा ऊर्फ गजाबा पावलसराव कांबळे,
वयः ४३ वर्षे,
रा. सनसिटी साई अपार्टमेंट,
मंठा रोड, जालना.

२. दिपक किशोरसिंग ठाकुर (मयत) **.. आरोपी**

सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड.
आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. डी. डी. सोनवणे.

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | ०३.०९.२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०३.०९.२०१८ |
| दोषारोपपत्र दिनांक | ०२.११.२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | १५.०९.२०२३ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | १५.०९.२०२३ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | --------- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३.०६.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जिगा ऊर्फ गजाबा | ०६.०९.२०१८ | ०६.०९.२०१८ | भा.दं.वि चे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | -- |

अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.-१ | दादासाहेब निवृत्ती हरणे (नि.क्र.२७) | ठाणे अंमलदार |
| अ.सा.-२ | गजानन कोंडीबा कौळासे (नि.क्र.३१) | तपास अधिकारी |

ब. आरोपींच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०३.०६.२०२६

क. न्यायालयीन साक्षीदार :–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

निशाणी क्रमांकाची यादी :–

अ. अभियोगपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २८ | फिर्याद |
| २ | ३२ | घटनास्थळ पंचनामा |

ब. बचावपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | १६ | दोषारोप |

ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | एक चाकु |

**न्यायनिर्णय**

(पारीत दिनांक ०३.०६.२०२६)

०१. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

०२. थोडक्यात अभियोगपक्षाची हकीकत अशी की, सुमारे आठ महिण्यापुर्वी फिर्यादीने जिगा कांबळे याचेकडुन दिपक ठाकुर याचे मध्यस्थिने ₹१०,०००/- हातउसने घेतले होते व ते हातउसने पैसे फिर्यादीने दोन महिण्यानंतर ₹१५,०००/- परत केलेले आहेत. परंतु जिगा कांबळे व दिपक ठाकुर दोघे नेहमी फिर्यादीला उसने घेतलेले पैसे दे म्हणुन त्रास देत होते.

०३. दि.०३.०९.२०१८ रोजी सकाळी ०८.३० वाजता दिपक ठाकुर हा फिर्यादीच्या घरी आला व तुला जिगा याने गुरुबचन चौक येथील त्याच्या चहाच्या हॉटेलवर बोलावले आहे असे म्हणाला म्हणुन फिर्यादी ०९.०० वाजता जिगा कांबळेच्या हॉटेलवर आला. तेंव्हा जिगा कांबळे व दिपक ठाकुर हे फिर्यादीला उसने दिलेले पैशांपैकी तुझ्याकडे आणखी पैसे निघतात, ते पैसे दे असे म्हणाले. फिर्यादी त्यांना तुमचे सर्व पैसे दिलेले आहेत, आता माझ्याकडे पैसे बाकी नाही असे म्हणाल्याने जिगा कांबळे व दिपक ठाकुर यांनी फिर्यादीला शिवीगाळ करून पैसे कसा देत नाही असे म्हणुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. जिगा कांबळे याने त्याच्या हॉटेल मधील कांदा कापण्याच्या चाकुने फिर्यादीच्या उजव्या हातावर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या उजव्या हाताचे बोटाला जखम होवुन सहा टाके पडले आहेत. दिपक ठाकुर याने लाकडाने फिर्यादीच्या दोन्ही पायावर मारले त्यामुळे डाव्या पायाला जखम झाली व उजव्या पायाला सुध्दा मार लागला आहे म्हणुन फिर्यादीने फिर्याद दाखल केली.

०४. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अंमलदार सदर बाजार यांनी गुन्हा क्रमांक ४०२/२०१८ नोंदविला व गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री. जी. के. कौळासे यांना दिला. त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट देऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवुन आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

०५. खटला प्रलंबित असताना आरोपी क्र.२ हा मयत झाल्याने त्याचे नाव कमी करण्यात आले. माझे पुर्व पीठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र.१ विरुध्द नि.क्र.१६ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपी क्र.१ ला वाचुन व समजावुन सांगितले असता आरोपी क्र.१ याने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

०६. सदरील प्रकरणाच्या योग्य निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी खालील मुद्दे विचारात निघतात व खालील नमुद कारणांसहित निष्कर्ष नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने मयत आरोपी दिपक ठाकुर बरोबर संगनमत करुन फिर्यादीच्या उजव्या हातावर कांदा कापण्याच्या | : | नाही. |

चाकुने मारुन ईच्छापुर्वक दुखापत केली?

| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने मयत आरोपी दिपक ठाकुर बरोबर संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली? | : | नाही. |
| ०३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने मयत आरोपी दिपक ठाकुर बरोबर संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले व अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा अपराध घडावा असे कृत्य केले? | : | नाही. |
| ०४. | आदेश कोणता ? | : | आरोपी क्र.१ ची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

**कारणमिमांसा**

०७. आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले. निशाणी क्रमांक १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली. आरोपी क्र.१ विरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपी क्र.१ चा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.३५ वर नोंदविण्यात आला असता खोटी केस केल्याचा बचाव आरोपी क्र.१ ने घेतला आहे.

०८. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड व आरोपी क्र.१ चे विधिज्ञ श्री.डी. डी. सोनवणे यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ४:**

०९. मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी संलग्न व मिळते जुळते असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चेस विचाराधिन घेण्यात येत आहेत. साक्षीदार दादासाहेब हरणे यांच्या साक्षीप्रमाणे दि.०३.०९.२०१८ रोजी ते सदर बाजार पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत असतांना फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. सदरची फिर्याद फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. तपासी अंमलदार यांच्या साक्षीप्रमाणे त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन चाकु जप्त केला. तसेच साक्षीदारांचे जाब जबाब नोंदवुन वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले.

१०. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, फिर्यादी व इतर साक्षीदारांना वारंवार साक्षीसमन्स काढुन देखिल अभियोगपक्ष त्यांना हजर ठेवण्यास अपयशी ठरला आहे. ठाणे अंमलदार यांच्या साक्षीवरुन दि.०३.०९.२०१८ रोजी फिर्यादीने फिर्याद दाखल केल्याचे दिसुन येत असले तरीही फिर्यादीची साक्ष झालेली नसल्याने फिर्याद मधील मजकुर कायदेशीररित्या सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे तपासी अंमलदार यांनी घटनास्थळावरुन चाकु मिळुन आल्याचे कथन केले असले तरीही पंच साक्षीदार यांची साक्ष झाली नसल्याने फक्त तपासी अंमलदार यांच्या साक्षीवरुन जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. फिर्यादीची साक्ष झाली

नसल्याने देखिल जप्त चाकु तोच होता असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. सबब उपलब्ध पुराव्यावरुन आरोपी क्र.१ ने मयत आरोपीच्या संगनमताने फिर्यादीला चाकुने वार करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली हे सिध्द होत नाही. सबब आरोपी क्र.१ वरील गुन्हा सिध्द होत नसल्याने आरोपी क्र.१ निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

०१. आरोपी जिगा ऊर्फ गजाबा पावलसराव कांबळे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३ व ५०४ चे गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

०३. जप्त मुद्देमाल एक चाकु याची अपिल कालावधीनंतर योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

०४. आरोपी क्र.१ ने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम ₹१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र सादर करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायदानकक्षात घोषित करण्यात आला.

Digitally signed by SEEMA MAHADEVRAO PADOLIKAR
Date: 2026.06.03 15:40:42 +0530

(सि. म. पाडोळीकर)

दिनांकः ०३.०६.२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी,
जालना.

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०३.०६.२०२६

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी. डी. एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :– यशवंत दा. वाघ

न्यायालयाचे नाव :– मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, जालना

पी.डी.एफ.दिनांक :– ०३.०६.२०२६

स्वाक्षरीत/-

लघुलेखक

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०३.०६.२०२६